# जकातदार लेवीने, पापी लोकांची येशूशी भेट घालून दिली

मुलांना शिकविणाऱ्यांनी S5b हा अभ्यास वाचावा.

1. **देवाच्या वचनाद्वारे तुमच्या अंत:करणाची व मनाची तयारी करा.**

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु येशू, तुझे अनुयायी होण्यासाठी तू प्रत्येक ठिकाणच्या व्यक्ती आणि कुटुंब तयारी करतोस अशा व्यक्तींना शोधून त्यांना त्यांच्या गटांमध्ये जाऊन भेटण्यास आमचे साहाय्य कर."



**पाहा मार्क 2:14-17** मध्ये येशू पापी लोकांना त्यांच्या घरी जाऊन कसा भेटला.

- येशू जकातदारांविषयी काय करतो? *(वचन 14)*
- येशूला आपल्या घरी कोणी जेवायला यायचे आमंत्रण दिले? *(वचन 15)*
- लेवीने आणखी कोणाकोणाला घरी आमंत्रित केले होते? *(वचन 15)*
- येशू आणि ते पापी लोक काय करीत होते? *(वचन 16)*
- येशूने कोणत्या लोकांना पश्चात्ताप करण्यास पाचारण केले? *(वचन 17)*

**पाहा प्रे. कृ. 10:24-33** मध्ये पेत्राने देवाचा शोध करणाऱ्यांची त्यांच्या घरी जाऊन कशी भेट घेतली.

- कर्नेल्याने कोणत्या प्रकारच्या लोकांना आपल्या घरी आमंत्रित केले? *(वचन 24)*
- विश्वास न ठेवणाऱ्यांकडे पेत्र कोणत्या नव्या दृष्टीकोनातून पाहतो? *(वचन 28)*
- कर्नेल्याने पेत्राला त्याच्या घरी येण्याचे आमंत्रण का दिले? *(वचन 30-32)*
- कर्नेल्याने पेत्राने त्याला, त्याच्या नातेवाईकांना व मित्रांना काय सांगण्यासाठी आमंत्रित केले? *(वचन 33)*

**पाहा प्रे. कृ. 28:30-31** मध्ये पौलाने त्याच्या घरी येणाऱ्यांचे कसे स्वागत केले आणि त्यांना शिक्षण दिले,

- पौल रोममध्ये किती काळ भाड्याच्या घरात राहिला?
- त्याच्या घरी येणाऱ्यांशी तो कशाविषयी बोलत असे?

**पाहा 1 करिंथ 14:24-26** मध्ये विश्वास नसणारे लोक गटाला भेट द्यायला येतात तेव्हा कसे वागावे.

- गटातील किती लोकांना इतरांशी बोलायची परवानगी द्यावी?

- विश्वासणाऱ्यांनी गटाला उद्देशून केलेला उपदेश ऐकून देव विश्वास न ठेवणाऱ्यांच्या अंत:करणांत काय कार्य करील?

विश्वासणाऱ्यांना पुढील दोन महत्त्वाच्या गोष्टी अगदी सहजपणे लहान गटात करता येतील.

1. नवीन विश्वासणाऱ्यांना अगदी सहजपणे विश्वास नसणाऱ्या आपल्या मित्रांना व नातेवाईकांना येशूविषयी ऐकण्यासाठी लहान गटांमध्ये घेऊन येता येते. जक्कय, मत्तय व कर्नेल्य ह्यांनी लूक 19:1-10, मत्तय 9:9-13 व प्रे. कृ. 10:22-24
2. परिपक्व विश्वासणाऱ्यांना 'एकमेकांविषयीच्या' आज्ञा अगदी सहजपणे आचरणात आणता येतील. लहान गटामध्ये प्रत्येकाला ऐकता येते आणि सक्रिय सहभाग घेता येतो. नवीन विश्वासणारे बुजरे असतात म्हणून त्यांची तयारी झाल्याशिवाय त्यांना बोलण्यास लावू नका.

तथापि लहान गटांमध्ये किंवा गृहमंडळ्यांमध्ये एकत्र आले म्हणजे गट वरील दोन गोष्टी करीलच याची खात्री नाही. कधी, पारंपारिक मंडळी मधील विश्वासणारे निष्क्रिय 'श्रोते' असतात किंवा त्यांना फक्त वर्गात दिले जाणारे पारंपारिक शिक्षणच माहीत असते. यात विचारांच्या देवाण घेवाणीला वाव नसतो. असे लोक अशा चुका स्वत: बरोबर लहान गटात आणतात.


## 2. आगामी आठवड्यातील कार्यक्रमांची सहकाऱ्यांबरोबर आखणी करा

- विश्वास न ठेवणाऱ्यांना येशूविषयी शिकायचे असेल तर जाऊन त्यांना भेटा. तसेच इतरांनाही ऐकण्यास बोलावण्याची व्यवस्था करण्यास सांगा.
- मंडळीमध्ये नवीन विश्वासणारे असतील तर त्यांना घरी जाऊन भेटा आणि येशूविषयी ऐकण्याकरिता विश्वास न ठेवणाऱ्या मित्र व नातेवाईकांना बोलावण्यास सांगा.
- या "जमलेल्या गटांना" जुन्या करारातील कथा वृत्तांत सांगा. यामुळे एकच खरा व पवित्र देव आपल्या प्रार्थना ऐकतो आणि तो सर्वमर्थ आहे हे त्यांना समजेल. यात पुढील उदाहरणे असावीत, जलप्रलय (उत्पती 6:5-22), सदोमाचा पाडाव (उत्पत्ती 18:20 ते 19:29) आणि बआलचे मूर्तीपूजक याजक (1 राजे 18).
- येशू विषयीचाही कथावृत्तांत सांगा. त्यातून त्याची प्रीती व क्षमाशीलता दाखवा. ह्या प्रकारच्या कथावृत्तांतांचा अभ्यास तुम्ही वर भाग 1 मध्ये केलेला आहे.
- लोकांना नियमित सातत्याने भेटण्याचे निमंत्रण द्या.
- सभेला येणाऱ्या लोकांचा यजमानांच्या साहाय्याने स्वागत करा. त्यांना एकमेकांकडे तोंड करून बसवा. त्यांच्या संस्कृतीनुसार त्यांना एकमेकांची सहभागिता घेऊ द्या.
- सुवार्ताप्रसाराच्या गृह सभांचे आयोजन कसे करायचे याविषयी पुढे दिलेला सल्ला आचरणात आणा.

लहान गटामध्ये, लोकांना सहजपणे एकमेकांशी संवाद साधता येईल अशा तऱ्हेने खुर्च्यांची किंवा इतर बैठकीची व्यवस्था करा.

खुर्च्या एका मागे एक अशा ओळीत ठेवाव्यात यात मागच्या व्यक्तीला पुढच्याची पाठ, डोके दिसते की लोकांची तोंडे एकमेकांना दिसतील अशा पद्धतीने खुर्च्यांची मांडणी करावी? *(उत्तर: खुर्च्यांची तोंडे एकमेकांकडे करून ठेवली म्हणजे लोकांना चांगले ऐकता व संवाद साधता येईल)*





**3. आगामी उपासना सभेविषयी सहकाऱ्यांबरोबर योजना आखा.**

तुमच्या गटाच्या सध्याच्या गरजांनुरूप कार्यक्रम निवडा.

मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका व प्रश्न सादर करण्यास संधी द्या.

वर (भाग 1) दिलेले कथावृत्तांत वाचून दाखवा; अगर सांगा आणि तेच प्रश्न विचारा.

फिलिप्पै येथील तुरूंगाच्या अधिकाऱ्याचे कुटुंब एकत्र जमते (प्रे. कृ. 16:22-34) याविषयी वाचून तुम्हांला त्यावर चर्चा करता येईल.

सुवार्ताप्रसाराच्या गृह सभा आयोजित केल्या असल्यास त्यासाठी उपासनेमध्ये प्रार्थना करा.

सुवार्ताप्रसाराच्या गृह सभांसाठी आलेल्या शिफारशींचा विचार करा (पुढे पाहा).

नुकत्याच झालेल्या सुवार्ताप्रसाराच्या गृह सभांविषयी साक्षी आणि अहवाल देण्यास सांगा.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी प्रे. कृ. 2:43 वाचा आणि आरंभीच्या मंडळ्यांनी प्रभुभोजनाचा विधी घरांमध्ये साजरा केला हे स्पष्ट करून सांगा.

दोन वा तीन जणांचे गट करा. एकमेकांना प्रार्थना करून प्रोत्साहन द्या. योजनांना अंतिम स्वरूप द्या.

पाठ करा 1 करिंथ 14:24-25.



*तुम्ही नवीन मंडळ्यांसाठी पुढाऱ्यांना प्रशिक्षण देत असाल आणि अद्याप पौल तीमथ्य अभ्यास A0f नवशिक्या मेंढपाळांना प्रशिक्षण देणाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्वे, हा अभ्यास वाचला नसेल तर कृपा करून आता वाचा.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net